श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १ ले. | ज्येष्ठ शके १८४५ | अंक ३ रा.



संपादक:—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशक:—रामचंद्र आत्माराम तर्खड

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका


१ भक्तजनांचे अनुभव ... ... १-१६

२ स्फुट प्रकरण

आतांपर्यंत छापून आलेल्या महाराजांच्या टीपा. ... ... [illegible]

श्रीसाई हनुमानाष्टक, ... ... ... [illegible]

३ श्री साईसच्चरित ... ... ... ४८-६८


---

## शुद्धीपत्र

श्री साईलीलेच्या गेल्या म्हणजे दुसरे अंकांत पृ० ५ वर दिलेल्या आर्यांतलकांत आर्या नंबर ५ ही चुकून अपुरी छापण्यांत आली आहे; ती खाली लिहिल्याप्रमाणें असावयास पाहिजे:—

“ घडतें सख्यातें नाम तरी नित्य घेती जे वदनीं
त्यांची पापें जाती आनंदें वास करिती सुखसदनीं ”

अंक २ पृ० ११ अभंग १ चरण २ यांत ‘ गुरु ’ चे जागीं ‘ गुरू ’ असें वाचावें; चरण ३ यांत ‘ गुरू ’ चे जागीं ‘ गुरु ’ वाचावें.

# श्रीसाई लीला.

( मासिक )

वर्ष १ लें | ज्येष्ठ शके १८४५ | अंक ३ रा

## महाराजांचे अनुभव

रा. रा. नीळकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे यांनी श्रीसमर्थ साईबाबांचे बाबतीत आपल्यास आलेल्या अनुभवाचें ता. १८-२-२० रोजीं एक पत्र लिहिलेलें आहे. त्यांतील बराचसा भाग फारच वाचनीय वाटल्यावरून खालीं देण्यांत येत आहे तो येणेंप्रमाणें:—

( १ ) सन १९१० साली डिसेंबर महिन्याचे प्रारंभी मी पार्ले येथें एका बंधूच्या घरीं रात्रीं " पंचदशी " वाचीत असतां सुमारें ११ वाजतां मित्र भाऊसाहेब दीक्षित आणि नानासाहेब चांदोरकर हे मुंबईहून पारले येथें जात असतां तेथें अकस्मित आले; व थोडेंसें बोलणें होऊन नंतर "तुम्ही शिरडीस केव्हां जाणार" असा प्रश्न नानासाहेबांनीं मला विचारला त्यास " केव्हा तरी जाईन " असा मी जबाब दिला. ह्यापूर्वी त्या दोन्ही मित्रांनीं शिरडीस श्रीच्या दर्शनार्थ जाण्याविषयीं मला आग्रहपूर्वक बरेच वेळ सांगितलें होतें, असें असतां माझा तेथें जाण्याचा बेत ठरलेला नाहीं, हें पाहून मला ताबडतोब दुसरे दिवशींच ( रविवारीं ) निघण्याविषयी त्यांनीं आग्रह केला; आणि सोमवारीं पेन्शन घेऊन जाईन असें मी त्यांना सांगितलें; तेव्हां माझ्या जाण्याविषयीं त्या दोघांची व विशेषत: नानासाहेबांची आतुरता इतकी विलक्षण होती कीं, त्यांचा व माझा परिचय विशेष दृढ नसतांहि त्यांनी खर्चाकरितां मला दहा रुपये देऊन तुमचें " पेन्शन आणविण्याची तजवीज अण्णासाहेब दाभोळकर करतील " असे मला सांगितलें हा प्रकार थोडासा शिष्टसांप्रदायाविरुद्ध

होता, तथापि त्यांच्या सद्हेतूकडे लक्ष देऊन मला त्यांचें म्हणणें कबूल करावें लागलें. तथापि मला शिरडींत, बरेच दिवस राहण्याची इच्छा झाल्यास दहा रुपये कसे पुरतील हा प्रश्न मी उपस्थित करतांच, मला लागतील तितके पैसे बिनहिशोबी देण्याबद्दल भाऊसाहेबांनीं आपल्या शिर्डी येथील खजीनदाराच्या नांवें मला एक पत्र दिलें. जाण्याचा माझा बेत नसतांहि मी निरुत्तर होऊन मुकाट्यानें त्या मित्रांचें म्हणणें मान्य केलें, आणि दुसरे दिवशीं सायंकाळीं शिर्डीच्या मार्गास लागलों. मुंबई-हून मनमाडास जाणाऱ्या मेल गाडींत बसतों तोंच माझ्या डब्यांत "एम्. ए"-ची परिक्षा झालेले व "एल्‌एल्. बी" च्या-परिक्षेस लवकरच बसणारे कोपरगांवचे एक तरुण गृहस्थ होते. त्यांच्याशी माझें बोलणें सुरू झालें, तेव्हां "शिर्डीच्या साईबाबांची आपणांस कांहीं माहिती आहे काय?" असा मी त्यांना प्रश्न केल्यावरून "तो वेडा पीर मला चांगला माहीत आहे" असा त्यांनीं मला जबाब दिला. तो ऐकून शिर्डी येथील खुळ्याच्या बाजाराविषयींची माझी पूर्व कल्पना दृढ झाली. बाटेत कोपरगांव येथें ह्या नूतन मित्रांच्या घरीं सोमवारीं सकाळीं चहा वगैरे होऊन ९।१० वाजण्याचे सुमारास मी शिर्डीस पोहोंचलों. टांगेवाल्यानें मला रावबहादूर साठे यांच्या वाड्यांत नेलें; आणि तेथें मी भाऊसाहेबांच्या खजीनदारांचा ( माधवराव देशपांडे यांचा ) शोध करणार, इतक्यांत तेथें एका उघड्या दालनांत बैठकीवर बसलेले माझे जुने मित्र श्रीयुत लक्ष्मण कृष्णाजी उर्फ तात्यासाहेब नूलकर यांच्याकडे माझी नजर जाऊन मी त्यांच्या नांवानें त्यांना हाक मारून नमस्कार केला. तेव्हां मध्यंतरी अनेक वर्षे भेटीमुळें त्यांनीं प्रथमत: मला न ओळखल्या-कारणानें आमचें थोडेसें विनोदपर भाषण झाल्यावर मी आपलें नांव त्यांना सांगतांच त्यांनीं मला मोठ्या प्रेमानें दृढालिंगन देऊन माझें पुढचें सर्व काम करण्याचा त्यांनाच हक्क असल्यामुळें त्यांनी मला तेथें बसवून घेतलें. नंतर माधवराव देशपांडे यांना त्यांनीं बोलावून आणून माझी सर्व हकीकत त्यांना निवेदन केली. पुढें श्रींच्या आरतीची वेळ होण्या-पूर्वी आम्हीं स्नानें आटोपून घेतलीं. व तात्यासाहेबांनीं मला आपल्या बरोबर आरतीसाठीं मशीदींत नेलें. श्रींच्या चरणांवर तात्यासाहेबांनीं

मस्तक ठेवून ते शेजारीं उभे राहिल्यावर मी केवळ शिष्टसांप्रदायानुसार त्यांचें अनुकरण केलें, तों लागलीच " तात्याबाळा नमस्कार करावा, बापूसाहेबाला नमस्कार करावा, त्यांत आपल्याला कांहीं कमीपणा नाहीं" असे शब्द श्रीच्या मुखांतून निघाले. हा प्रकार वारकरी मंडळींत सार्वत्रिक दृष्टीस पडतो. बापूसाहेब जोग यांचा व माझा तात्यासाहेबांनीं पूर्वीच परिचय करून दिला होता. तेव्हां श्रीच्या उक्तीप्रमाणे पुन: फक्त शिष्टसांप्रदायार्थ मीं त्या दोघांना नमस्कार करून उभा राहिलों, तों लागलीच " तात्याबाची सेवा करीत जा " असे शब्द मला उद्देशून श्रींच्या मुखांतून निघाले; आणि हेच सेवेसंबंधीं शब्द पुन: दुसरे दिवशीं व फिरून तिसरे दिवशीं असे त्रिवार दुपारच्या आ रतीच्या वेळीं मला उद्देशून श्रींनीं उच्चारिले. हुबळी येथील श्री सिद्धारूढ स्वामी, एलिचपूर येथील श्री शंकर महाराज, पळूस येथील धोंडीबाबा, व सुमारें वीस बावीस वर्षांपूर्वी पुणें येथील सोमेश्वराचे देवळांत कांहीं दिवस असलेले एक खरे परमहंस. इत्यादि पुरुषश्रेष्ठांच्या दर्शनानें वेदान्तपर ग्रंथांत सांगितल्याप्रमाणें सत्पुरुष जगांत आहेत, अशी कल्पना पूर्वीच दृढ झाली होती, तरी श्रीच्या अधिकाराबद्दल मन साशंकित असल्याकारणाने प्रथमदिवसापासूनच श्रींच्या आज्ञेनुसार मला कांहीतरी सेवा सांगण्याविषयी, केवळ विनोदानें, मी तात्यासाहेबांना बराच आग्रह करीत असें; आणि सरतेशेवटीं "तुमच्या थट्टेनें मला फार दु:ख होतें, येवढ्याकरितां तरी ती आतां पुरी करा" असें त्यांनी मला स्पष्ट सांगितलें तोंपर्यंत कित्येक दिवस माझा तो क्रम सुरू होताच.

यानंतर एकदां " आपल्या बोलण्याचा प्राय: कांहीं एक अर्थबोध होत नसून, ही आपली बडी भक्तमंडळी त्याचा उगीच खुळ्यासारखा खल करीत बसतात, तसें मी कांहीं करणार नाहीं. मला कांहीं सांगावयाचें असेल तर तें आपण मला अगदी स्पष्ट सांगावें" अशी बाबांना मी विनंति केली; तेव्हां "ठीक आहे" येवढेंच ते म्हणाले; आणि नंतर थोडक्याच दिवसांत "आमचा अनुभव वैलाभरचा ( Indirect ) नाहीं; ज्याला तो पटला असेल त्याने जावें नसेल त्यानें तो घेऊन जावें " असे ते आपल्या नेहमीच्या लाक्षणि- ( Parabolical ) भाषणात

प्रत्यक्षच होऊन गेले. हे शब्द फक्त माझ्यासाठींच होते, हें माझ्या लक्षांत आलें; आणि "ठीक आहे, आतां माझी खात्री होईपर्यंत मी येथून जाणार नाहीं" असें मी त्यांना तावडतोब बजावून सांगितलें, तेव्हांही ते फक्त "ठीक आहे" येवढेंच बोलले. माझ्या परत जाण्याची गोष्ट बाबांपाशीं माधवराव देशपांडे नेहमीं दोन चार दिवसांनीं काढीत असत, अशा वेळीं एकदां "आपल्याला त्याचें काम आहे, त्याला मशीदीपाशीं असाच कुत्र्यासारखा पडून राहूं दे" असें ते म्हणाले; आणि दुसऱ्या एका वेळीं '(जो) आपलाच आहे, त्याचें काम मलाच केलें पाहिजे; माझ्याशिवाय त्याला कोण आहे?" असें मला अभिवचन मिळालें. इतके दिवसपर्यंत तात्यासाहेबांची प्रकृति उत्तम होती; परंतु नंतर थोडक्याच दिवसांत ती फारच बिघडली, तेव्हां ते बरे होईतोंपर्यंत तेथून परत न जाण्याचा मी निश्चय केला; आणि सरतेशेवटीं मार्च महिन्यांत त्यांचा तेथेंच अंत झाला. ह्या त्यांच्या दुखण्यामध्यें श्रींच्या मुखांतून माझ्या पहिल्या तीन दिवसांत निघालेल्या उक्तीची तथ्यता तेथील सर्व लोकांस आणि विशेषतः तात्यासाहेबांस इतकी बेमालूम पटली की, एके दिवशीं "नीलकंठराव! बाबांनीं केवळ माझे हाल होऊं नयेत, येवढ्याच करितां तुम्हांला येथें आणिलें, असाच त्यांच्या प्रथम दिवसाच्या आज्ञेचा स्पष्ट अर्थ नव्हे कांय?" असा त्यांनीं डोळ्यांत अश्रू आणून मला प्रश्न केला. आणि अखेरीस दृष्टि एकाग्र करून आपल्या दोन्ही चिरंजिवांना "आतां दृष्टी पुढें ऐसाचि तूं राहे" हा अभंग म्हणावयास सांगून, त्यांचें भजन चाललें असतां श्रींचे पादोदक मी त्यांना दिल्यानंतर आपली दृष्टि स्पष्ट अढळ ठेवून त्यांनीं प्रातःकालीं देहत्याग केला. हा प्रकार घडण्याचे पूर्वी आदले दिवशीं सुमारें २-३ वाजतां (त्यांची प्रकृति विशेष बिघडावयास लागण्याचे अगोदर) "माझें म्हणणें ऐकून तात्याबा येथें राहिला आणि त्यानें आपल्या देहाचें सार्थक केलें;" असे श्रीबाबा माधवराव देशपांडे यांना म्हणाले होते; परंतु त्यावेळीं तात्यासाहेबांचा अंत इतका जवळ आला आहे, अशी नुसती कल्पना देखील, "एल्. एल्. एम्. ॲण्ड एस्." ची परिक्षा पास होऊन जळगांव येथें स्वतंत्र प्रॅक्टिस् चालवीत असलेल्या यांच्या थोरल्या चिरंजीवांनाही आली नां

तात्यासाहेबांचा अंतकाळचा प्रकार पाहून "असा मृत्यु येणें हें महा पुण्याचें फल आहे" असे उद्गार तेथील सर्व भक्तमंडळींच्या तोंडून निघाले; कारण सर्वांना त्या वेळीं साहजिकच "अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् । यः प्रयाति स्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥" हा भगवदुक्तीचें स्मरण झालें. हा बाबांचा प्रसाद.

( २ ) रात्रीं स्वप्नें न पडणें: अलीकडे ३५।३६ वर्षांत एक आठवडाहि गेलेला मला स्मरत नाहीं; परंतु शिरडीस असतांना महिनेच्या महिने माझे तसे गेले. याचें कारण बाबांच्या कृपेशिवाय दुसरें कांहीं असेल, अशी माझी कल्पनाहि होत नाहीं; कारण शिरडीस माझी प्रकृति जितकी चांगली होती, तितकी किंवा त्याहूनहि अधीक चांगली अनेकदां इतरत्रही असे; परंतु स्वप्नें हीं नेहमी पडावयाचींच.

( ३ ) एकदां दुपारच्या आरतीच्या वेळीं एका गृहस्थानें आणलेल्या मिठाईचा प्रसाद श्री मंडळीस वाटीत असतांना, आपली पाळी येते किंवा नाहीं अशी कल्पना माझ्या मनात येतांच, "तुला कांहींच नाही" अशी हातानें खूण करून बाबांनी स्मित हास्य केलें, आणि नंतर मला प्रसाद दिला.

( ४ ) दादाभट देशपांडे हें नांव माझ्या नांवाऐवजीं घालून एके दिवशीं माझ्या मानी व करारी स्वभावाचें, माझ्या कुटुंबाचें आणि परिस्थितीचें बाबांनी हुबेहुब केलेलें वर्णन ऐकून भाऊसाहेब दीक्षितांनी "हे दादाभट देशपांडे कोण ?" असा मला प्रश्न केला; कारण त्या नांवाचा गूढार्थ माझ्याप्रमाणें त्यांनाहि पूर्णपणें समजला. इतरांना मात्र तो समजला नाहीं.

( ५ ) एके दिवशी मी मशीदींत गेल्याबरोबर 'या रामय्या' असें म्हणून बाबांनी मला वर बोलाविलें; आणि पुढें कांहीं दिवसांनीं उदी ( अंगारा ) वाटतांना माझी नमस्कार करण्याची पाळी आली, तेव्हां मी नमस्कार केल्यावर माझ्या हातांत उदी देऊन मस्तकावर हात ठेवतांना "रामरामीध्या" असें ते म्हणाले; कारण "श्रीरामं सर्व कर्माणि" (निवेदयेत् ) हा वाक्यावर माझी श्रद्धा होती.

( ६ ) एकदां माझ्या मनांत एक सारखें तीन दिवस "आपणा सारिखे करिती तात्काळ" ह्या संतोक्तीचें चिंतन चाललें असतांना, मला परत जाण्याविषयी आज्ञा केव्हां होणार, असा माधवराव देशपांडे ह्यांनी बाबांस प्रश्न केला, तेंव्हां "माझ्या जाग्यावरून मला उठवून तेथें त्याला एकदम बसावयास पाहिजे; त्याला मी काय करूं? तें काम फार सबूरीचें आहे" असे स्पष्ट शब्द बाबांच्या तोंडातून निघालेले ऐकून मी चकित झालों. इतर कोणांसहि ह्या त्यांच्या बोलण्याचा अर्थ मुळींच समजला नाही.

( ७ ) शिर्डी येथें प्रथम जातांना ज्या तरुण विद्वान गृहस्थांचा माझा नूतन परिचय झाला होता, तेच गृहस्थ नंतर सुमारें १।२ महिन्यांनी शिर्डीस आले त्यावेळीं बाबांच्या अधिकाराविषयींची माझी मूळची साशंकित वृत्ति सर्वस्वी नष्ट झालेली असल्यामुळें मी सहजच त्या गृहस्थांना पुन्हां पूर्वींचाच प्रश्न केला; आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, बाबांना तत्पूर्वी अनेकदां पाहून त्यांच्याविषयी जो त्यांनी आपलों ग्रह करून घेतला होता, तो अवघ्या अर्ध्या तासांत बदलून गेल्याचें त्यांनी स्वमुखानें कबूल केलें; परंतु ह्या ' मानसिक स्थित्यंतराबद्दल त्यांना कोणतेंही कारण मला सांगतां आलें नाहीं.

( ८ ) पहिल्या खेपेस बाबांनी मजपाशीं प्रथमतः १२ रुपये दक्षिणा मागितली, व नंतर कांहीं दिवसांनीं पुनः ८ रुपये दक्षिणा मागून घेतली. त्यापुढें कांहीं दिवसांनी आमचे मित्र रा. रामचंद्र वामन ऊर्फ भाऊसाहेब मोडक यांजकडून बाबांना दक्षिणा देण्यासाठीं सरन्यासाहेबांच्याकडे पांच रुपये मनीऑरडरनें आले, ते त्यांनी बाबांना देण्यासाठीं मजपाशीं दिले. ही रक्कम मी बाबांकडे हजर केली, तेंव्हां "हे रुपये तूंच ठेव, तुला खर्चास लागतील" असें बाबांनी मला सांगितलें; परंतु ते ठेवून घेणें इष्ट न वाटल्यामुळें, आधीं खर्चास लागणारी रक्कम मजपाशीं भरपूर असल्यामुळें, मी बाबांना तसें कळवून पुनः ते पांच रुपये परत करूं लागलों. तेंव्हां "ही रक्कम तुला खर्चास लागेल असें मी तुला सांगतों आहे, सबब ही तुजपाशींच असूं दे" असें त्यांनी-

मला फिरून सांगितल्यामुळें ती मी निरुपायास्तव ठेवून घेतली. नंतर परत जाण्याची आज्ञा मिळाल्यावर मी शिरडीहून मुंबईस किंवा पुण्यास जाणार होतों; परंतु कांहीं अकल्पित कारणानें मला शिरडीहून जळगांवास जाण्याचा प्रसंग आला. त्या वेळीं मला लागणाऱ्या रकमेंत बरोबर पांचच रुपयांची तूट आली, ती भरून काढण्यासाठीं बाबांनीं दिलेले पांच रुपये मोहोरबंद पाकिटांत घालून ते एका स्नेह्यापाशीं ठेवून त्याच्याबदली त्या गृहस्थापासून दुसरें पांच रुपये उसने घेऊन मी जळगांवी गेलों; आणि नंतर ते उसने घेतलेले रुपये परत करून आपलें मोहोरबंद पाकीट परत आणविलें

त्यानंतर जेव्हां जेव्हां मी शिरडीस गेलों तेव्हां तेव्हां प्रत्येक वेळीं मजपासून बाबांनीं दक्षिणा बरोबर १५ रुपयांचीच मागितली; आणि एके प्रसंगीं मजपाशीं पैसे नसल्यामुळें मी तसें सांगितलें तेव्हां काका ( भाऊसाहेब दीक्षित ) अथवा बापूसाहेब जोग यांजपासून रुपये आणून दे, असें बाबांनीं सांगितल्यावरून मी बापूसाहेबाकडे गेलों, तों ते न भेटल्यामुळें पुढें भाऊसाहेबांकडे गेलों; तेव्हां "तुमचे रुपये आम्हांला माहीत नाहीत; आम्हीं पोथी काढितों, आणि त्यांत तुम्ही आपले रुपये पाहून घ्या" असें त्यांचे शब्द ऐकून मी पोथी वगैरे पाहण्याच्या भानगडींत न पडतां बाबांच्याकडे परत जाऊन त्यांना झालेली हकीकत कळविली; आणि "पंधरा रुपये" याचा अर्थ काय तो सांगण्याविषयीं त्यांना विनंति केली; परंतु "सध्यां राहूं दे, पुढें पाहूं, आपल्याला इतकी घाई नको" असें बाबांनीं सांगितल्यावरून, मी स्वस्थ बसून विचार करीत असतां माझ्या जवळ असलेल्या एका वहींत श्री नाथ भागवतांतील दोन ओंव्या पूर्वी कधींतरी टिपलेल्या माझ्या अवलोकनांत येऊन, मला फार समाधान वाटलें; त्या ओंव्या अशा:—

वाचा नेमावी माझ्या नामें ॥ मन नेमावें ध्यान संभ्रमें ॥
प्राण नेमावा प्राणायामें ॥ इंद्रियें दमनें नेमावीं ॥ १ ॥

बुद्धि नेमावी आत्मविवेकें ॥ जीव नेमावा परमात्म सुखें ॥
इतुकेंनी तूं अवश्यकें ॥ होसी कौतुकें मद्रूप ॥ २ ॥

ह्या दोन श्लोक्यांत योग-साधनें पांच आणि दशेंद्रियांचें नियमन अशी आत्मज्ञान-प्राप्तीची दहा साधनें सांगितली आहेत; आणि बाबा मजपाशीं प्रत्येक वारीच्या प्रसंगीं जे पंधरा रुपये मागत आहेत ते हेच, अशी माझ्या मनांत कल्पना आली ती श्रद्धाजन्य होय; आणि "श्रद्धावाँल्लभते ज्ञानम्" हें भगवद्वाक्य आहे. व माझी श्रद्धा अंध नव्हती.

(९) माझ्या शेवटच्या वारीच्या प्रसंगीं प्रथम दर्शनीं "तू आलास हें चांगलें केलेंस; मी तुझी आठवण करीत होतों," असे मी पूर्वी कधींही न ऐकिलेले शब्द बाबांच्या मुखांतून निघाले; परंतु ते शेवटचें दर्शन होतें ही कल्पना बाबांनीं देहविसर्जन केलें ही बातमी मला समजेपर्यंत माझ्या मनांत आली नाहीं। ह्या खेपेस नाशा परत जाण्याचा बेत झाला, तेव्हां दोन-तीन दिवस मी भाऊसाहेबांकडून तिसऱ्या प्रहरीं निघण्याची परवानगी विचारीत होतों, कारण कोपरगांवाहून गाडी सांयकाळीं निघते अशी आम्हां सर्वांची समजूत होती. परंतु प्रत्येक दिवशीं "उद्यां सकाळीं जाऊं दे" असें बाबा सांगत असतां शेवटीं एक दिवस मी आग्रहानें तिसरे प्रहरीं निघण्याची परवानगी मिळवून कोपरगाव स्टेशनावर जातों तो गाडीची वेळ बदलल्यामुळें दुसरे दिवशीं प्रातःकाळपर्यंतः स्टेशनावरच मुक्काम करावा लागला.

एका प्रसंगीं आमचे मित्र रा० ब० गणपतराव अंजनगांवकर हे आपल्या कांहीं स्नेह्यांबरोबर शिर्डीस गेले होते, तेव्हां त्यांना ठाणें येथील डिस्ट्रिक्ट कोर्टाचे एका ठरावावरील सरकारी अपीलासंबंधानें सरकारी वकीलाला माहिती देण्यासाठीं रविवारीं हजर व्हावयाचें असल्यामुळें त्यांनीं आदले दिवशीं परत जाण्याची परवानगी मागितली असतां "त्याला इतक्या घाईनें परत जाण्याचें मुळींच कारण नाहीं" असें बाबांनीं अनेकदां सांगितलें; परंतु ह्या त्यांच्या सांगण्यावर आम्हांसारख्या किंचित लोकांचा विश्वास बसावा कसा? सरतें शेवटीं गणपतरावांच्या अत्याग्रहाच्या विनवणीवरून "बरें, जा, मर्जी तुझी" असें बाबा म्हणाले; आणि गणपतराव ठाण्याचे कोर्टांत नेमलेल्या वेळीं हजर झाले तोंच सरकारी वकीलांनी अपील आठ दिवस निघावयाचें नाहीं, असें

म्हणून माहिती घेण्याचेंही आठ दिवस लांबणीवर टाकलेलें पाहून त्यांना सत्पुरुषाबद्दलबद्दल सखेदाश्चर्य वाटलें ! असले अनेक प्रसंग माझ्या अवलोकनांत आलेले आहेत.

( १० ) बाबांच्या एका हाताला कांहीं जखम झालेली होती, तिच्यावर ते नेहमी प्रातःकाळीं एक लांब फडकें इतकें घट्ट बांधून ठेवीत कीं, त्यापासून इतर कोणालाही असह्य वेदना झाल्या असत्या. शिवाय त्या जखमेस ते दुसरा कोणताहि उपाय करीत नसत, व कांहींतरी चांगला उपाय करण्याविषयीं भक्त मंडळींकडून त्यांना नेहमी आग्रह होत असे. अशा आग्रहाच्या वेळीं एकदा ते म्हणाले कीं, " चांगल्या हजार दोन हजार गोवऱ्या आणून त्या रसरशीत पेटवाव्या आणि ( आपल्या शरीरास बोट लावून ) हें आपें त्यांत टाकून कशी गम्मत चालते तें आपण बाजूस स्वस्थ उभे राहून पहावें ! " ह्याचें नांव खरें व्यतिरेक ज्ञान.

( ११ ) मी बांद्याहून निघाल्यानंतर तेथील एका संपन्न वृद्ध गृहस्थानें एक मुलगा दत्तक घेतला होता, त्या मुलासह ते गृहस्थ, मी शिर्डीस असतांना, तेथें आले आणि दुर्दैवानें सुवृत्त मुलगा न मिळाल्याबद्दल त्याचें माझ्याशीं बरेंच बोलणें झालें. मुंबईहून निघतांना विडया ओढण्यास पूर्ण सवड मिळावी म्हणून मुलगा दुसऱ्या डब्यांत बसला होता, आणि बापाबरोबर कोपरगांव स्टेशनावर न उतरतां चुकून तो एक दोन स्टेशनें पुढें जाऊन नंतर नगराहून येणाऱ्या गाडीनें परत येऊन बापाच्या मागून सुमारें दोन तासानें शिर्डीस आला व आमच्याकडे न येतां दूर दुसरीकडे जाऊन बसला. नंतर आरतीचे वेळीं दुपारीं त्या गृहस्थांना घेऊन मी मशीदींत गेल्यावर आमचे मागून तो मुलगाहि तेथें आला व पुनः दूरच उभा राहिला. अर्थात् तो मुलगा कोण व कोणाचा हें मलाहि माहित नव्हतें, परंतु सर्वांबरोबर बाबांना त्यानें नमस्कार केला तों लागलीचें पुत्राच्या कर्तव्यासंबंधीं बाबांचा उपदेश सुरू झालेला ऐकून " हाच कां तुमचा दत्तक मुलगा " असें मी त्या मित्रास विचारिलें आणि त्यांनीं ' होय ' म्हटलें. पुढें तीन चार दिवसांत मुलाला तेथें

कंटाळा आल्यावरून त्यानें मुकाट्यानें तेथून सायंकाळीं प्रयाण करण्याचा बेत केला होता; परंतु आरतीनंतर मंडळी मशीदीतून परत जाण्यापूर्वीच " आज मला विचारल्याशिवाय येथून कोणीहि जाऊं नये " असें बाबांचें वचन ऐकून भीतीमुळें त्या मुलानें आपला पूर्वीचा बेत रहित करून ती सारी हकीकत आपल्या बापास कळविली.

संन्यासमार्गी ज्ञानी पुरुषांचा अशा अनेक प्रकारचा कर्मयोग असतो.

(१२) एके दिवशीं प्रातःकाळीं सुमारें ८।९ वाजण्याचे सुमारास संध्यावंदनादि कर्मं आटोपून भाऊसाहेब दीक्षित ध्यान करीत बसले असतांना त्यांना मध्येंच एकाएकीं एका विठ्ठल मूर्तीचें स्पष्ट दर्शन झालें; परंतु ती मूर्ति त्यांनीं पूर्वी कधींही अवलोकन केली नसल्याकारणानें ती कोठली हें त्यांना कळेना; तेव्हां ज्या सद्गुरूंच्या कृपेनें तें दर्शन घडलें, तेच त्या मूर्तीच्या क्षेत्राचीही माहिती करून देतील, असा भरंवसा ठेवून ते स्वस्थ राहिले. नंतर दोनप्रहरच्या आरतीच्या वेळीं बाबा भाऊसाहेबांस म्हणाले " कां काका ! आज विठोबा पाटील तुला भेटावयास आले होते ना ? " हें ऐकून भाऊसाहेबांना गहिंवर आला, आणि त्यांनीं बाबांना 'होय' म्हणून जबाब दिला; तेव्हां बाबांनी " तो मोठा पळपुटा आहे, तो एके ठिकाणीं राहणारा नाहीं, यासाठीं त्याला एका भक्कम खुंटयाशीं पक्का बांधून ठेव " असें त्यांना बजावून सांगितलें परंतु त्या मूर्तीच्या क्षेत्राचा उलगडा येवढ्यानें झाला नाहीं. या गूढ भाषणाचा अर्थ बाबा आणि भाऊसाहेब यांच्याशिवाय कोणासच न कळल्यामुळें आरतीहून परत घरीं जातांना आम्हीं भाऊसाहेबांस साहजीकच त्या भाषणाबद्दल पृच्छा केली तेव्हां त्यांनीं तो सर्व प्रकार आम्हांला साद्यंत निवेदन केला नंतर तिसरे प्रहरीं पंढरी-क्षेत्राच्या फोटोच्या कांहीं प्रती घेऊन एक नवीन गृहस्थ तेथें आले, आणि तो फोटो पाहतांच भाऊसाहेब गहिंवरून "हीच ती मूर्ति" असें म्हणाले ! यावरून श्रद्धावान् शरणागतांविषयींचें बाबांचें भक्तवात्सल्य आणि त्यांचा सर्वश्रेष्ठ अधिकार अगदीं स्पष्टपणानें व्यक्त होतात.

(१३) शिर्डी येथें जाणाऱ्या सर्व पाहुण्यांची योग्य व्यवस्था लावण्याचें काम, माधवराव देशपांडे यांच्याकडे असे; परंतु एके दिवशीं त्यांना सोडून

भाऊसाहेब दीक्षित सकाळीं शिर्डींहून मुंबईस येण्याकरितां निघाल्यानंतर ते, बापूसाहेब जोग, बाळासाहेब भाटे आणि मी; इतकी पांढरपेशांतील मंडळी होती. भाऊसाहेब गेल्यानंतर थोडक्याच वेळांत मध्यभागचे कमिशनर कर्टिस साहेब, त्यांची पत्नि, नगर जिल्ह्याचे कलेक्टर मॅकनील साहेब आणि कर्टिस साहेबांचे नेटिव्ह असिस्टंट रावबहादुर रामचंद्र नारायण ऊर्फ भाऊसाहेब जोगळेकर अशी बडी अधिकारी मंडळी शिर्डीच्या अगदीं नजीक येत आहे तोंच मशीदींत बाबांनीं आपली कफनी वर करून (कफनीच्या आंत कौपीन नेहमी असे) ते म्हणाले कीं "** हमारेकू देखनेकू आया है. पर हम तो नंगा-फकीर है" तेथें असलेल्या सेवेकरी मंडळीस बाबांच्या ह्या म्हणण्याचा अर्थ मुळींच समजला नाहीं. कारण मशीदीच्या समोर नवीन असें कोणीहि मनुष्य दिसत नव्हतें; परंतु दोन तीन मिनिटांत मशीदीवरून सदर अधिकारीवर्ग चावडीकडे जातांना दिसला, तेव्हां त्यांच्या बोलण्याचा खुलासा झाला. पुढें ती मंडळी चावडींत जाऊन बसल्यावर शोधाअंतीं बाळासाहेब भाटे ह्यांच्याशिवाय आपल्या परिचयाचें तेथें कोणीच नाहीं असें भाऊसाहेब जोगळेकर ह्यांना समजल्यावरून त्यांनीं आपला एक पट्टेवाला बाळासाहेबांस बोलावण्यासाठीं पाठविला. बाळासाहेबांच्या मनांत जावयाचें आलें नाहीं. म्हणून त्यांनीं पट्टेवाल्यास तसाच निरोप सांगितला, तेव्हां मी 'भाऊसाहेबांनाच प्रथम येथें बोलवून आणितों; आणि मग आपण त्यांच्याबरोबर चावडींत जाऊं' असें मी त्यांना सांगितल्यावर त्यांनीं माझें म्हणणें कबूल केलें; व माझ्या निरोपाप्रमाणें भाऊसाहेब बाळासाहेबांच्या घरीं आल्यावर आम्ही त्यांच्या बरोबर चावडींत गेलों. नंतर "आपला प्रातर्विधि सत्वर आटोपा" असा बाबांना निरोप सांगण्याविषयीं भाऊसाहेबांनीं मला सुचविलें, तेव्हां असला "अव्यापारेषुव्यापार" येथें कोणीहि करणार नाहीं, असें मी त्यांना सकारण सांगून त्यांची समजूत घातली. हा प्रकार कर्टिस साहेबांना कदाचित विलक्षण वाटेल अशा समजुतीनें भाऊसाहेबांनीं त्यांची व माझी बाळपणापासून विशेष मैत्री असल्याची हकीकत त्या साहेबांना कळविली. नंतर सर्वजण निमूटपणें बाबा मशीदींतून भिक्षेसाठीं बाहेर पडण्याची वाट पहात बसले; त्याच वेळानें बाबा मशीदींतून बाहेर पडून

चावडीकडे येत आहेत, असें पाहतांच मिसेस कर्टिस ह्या चावडीपुढील रस्त्यांत जाऊन बाबांना त्यांनी आपल्या पद्धतीप्रमाणें प्रणाम केला व मला आपल्याशीं चार शब्द बोलावयाचे आहेत असें म्हणाल्या, तेव्हां त्यांना " आवा घंटा ठैर जाव," असें बाबांनीं सांगितलें नंतर बाबा भिक्षेहून परत चावडीनजीक आल्याबरोबर मिसेस कर्टिस ह्यांनी पुन: खालीं रस्त्यांत जाऊन बाबांना पूर्वप्रमाणें प्रणाम करून आपला मानस कळविला, तेव्हां "एक घंटा ठैर जाव" असें बाबा झगाडे, आणि मशीदींत गेले. पुढें कर्टीस साहेबांना परत जाण्याची घाई असल्यामुळें थोडयाच वेळांत ती सर्व अधिकारी मंडळी मुकाट्यानें गेली.

---

एखाद्या जीवास दर्शनाचा लाभ घावयाचा असल्यास श्रीसाई महाराज तो योग कसा अचुक आणीत व त्याजला आपलेपाशीं कसा ओढून घेत याचें उदाहरण पहावयाचें असल्यास तें सोलापुरचे रा. रा. वासुदेव सदाशिव जोशी यांचें खालील पत्रांत, या साईलीलेच्या वाचकांस पहावयास सांपडेल

श्री सद्गुरुप्रसन्न ॥

( सत्यनारायणकंपनी सोलापूर कंपनी. स्थापन शके १८३३ मिती चैत्र शु॥ १ मॅनेजर वासुदेव सदाशिव जोशी. )

भक्तिपरायण रा. रा. गोविंद धोंडो पानसरे यांनीं सिद्ध पुरुष श्री "साईनाथ उर्फ साई बाबा" यांचे दर्शनाचा योग कसा आला, व त्यांचे बद्दल अनुभवसिद्ध मत काय आहे, असा प्रश्न केल्यावरून, सदहू सिद्ध पुरुषांची, पूर्व वृत्ती स्मरण करण्याचा अलभ्य योग त्यांनी आणिल्यामुळें, त्यांचे आभार मानून श्री नारायण कृपेनें व श्रीसद्गुरूच्या प्रसादानें, घड केलेली हकीकत सादर करतो. तिचा सानंद स्वीकार करून तींत योग्य ती दुरुस्ती करून आपल्या श्री साईलीलेंत तिला जागा द्याल अशी आशा करतों

या देहाची थोडक्यांत ओळख करावयाची म्हणजे या जीवास पूर्व कर्मानुसार नरांचे सोळावे वर्षापासून " यदहं तनहम् " या वाक्याची

जागृती होऊन केवळ देह प्राक्तन भोगण्याकरतांच गृहस्थाश्रमांत दाखल व्हावें अशा भावनेंत आज वयाचा सुमारें सदतीस वर्षांचा काळ गेला. या गेलेल्या काळांत अनेक साधुसंत व सत्पुरुषांच्या गांठी पडल्या. परंतु भूतलावर असलेल्या बद्ध, मुमुक्षू साधक व सिद्ध; अशा चार प्रकारांत सिद्धावस्थेत पोंचलेल्या पुरुषामध्यें "सिद्ध" पुरुष श्री " साईबाबा " हेच प्रथम गांठ पडलेले असें मोठ्या आनंदानें म्हणत आहे. असो.

भेटीचा योग:—मुमुक्षवस्थेंत पडलेले पेन्शनर मामलेदार घोडनदी येथील श्री० रा. रा. चिदंबर केशव उर्फ अण्णासाहेब गाडगीळ यांनी श्री क्षेत्र गाणगापूर येथें जलछत्र घातल्यामुळें सोलापूर पेठेशी संबंध पडून व्यवहारदृष्ट्या त्यांची गांठ पडली. नंतर समसमान संयोग झाल्यावर परमानंद प्राप्त होतो त्याप्रमाणें होऊन सदर गृहस्थांनीं शके १८३५ सालीं आज्ञा केली कीं, " मी शिर्डी मुक्कामीं आहें; येथें नामसप्ताह सुरू आहे तरी दर्शनाकरतां यावें, येण्याजाण्यास रुपये दहा खर्च लागेल, चिंता नाहीं. श्रीनारायण आपणास कोठेंही देईल; परंतु ही वेळ वाया जाऊं देऊं नये " याप्रमाणें विनंतीपत्र वाचून जो आनंद झाला तो लिहिणें शक्य नाहीं. नंतर व्यवहार पद्धतीप्रमाणें सहचारी जीवांची परवानगी घेऊन जरी द्रव्याची अडचण होती, तरी पण हा देह जाण्यास तयार होऊन सदर सिद्धांचे कृपेनेंच शिर्डी येथें रा. रा. गाडगीळ हे त्यांचे परम स्नेही रावबहादूर तात्यासाहेब साठे यांचे वाड्यांत होते तेथें दाखल झाला. नंतर स्नान संध्यादि कर्मविधि सारून सदर गाडगीळ यांचेबरोबर श्रीचे दर्शनास पूजा सामानासह तयार झाला. बाबा मशजीत मध्यें होते तेथें पूजा वगैरे आटोपून सर्व थाट पाहून देहाची तादात्म्यता झाली असें वाटलें. नंतर सायंकाळीं याच ठिकाणीं आर्ती वगैरे करून रा. रा. साठे यांचे वाड्यांत अजमासें ४०×५० इंच साईचा फोटो असेल, नक्की जाणत नाहीं. परंतु मोठा फोटो सदर श्री बाबा यांचा सदर वाड्यांत ओसरीवर ठेवलेला असोन त्याची पण दोन सांज पूजा आर्ती करण्याचा क्रम होता असें वाटतें. कारण सकाळीं ११।१२ चे सुमारास उतरल्यामुळें प्रथमच सायंकाळचा प्रोग्राम दृश्यमान झाला. त्या वेळीं कोणत्याही तऱ्हेची एकाग्रता करण्याची या देहास संवय असल्यामुळें आर्ती सुरू झाल्यापासून

ती संपेपर्यंत श्री बाबांचे मुखकमळावर दृष्टी एकाग्र झाली. त्यावेळी मुख-कमल न दिसतां वस्त्राच्छादित असलेले शिरोभागाचे ठिकाणी नारसिंह स्वरूप दिसूं लागलें. त्याच नादांत हा जीव रंजित होऊन भान न राहिल्यामुळें आर्ती समाप्त झाली तरी जागृती नाहीं. सदर गाडगीळ यांनीं हालवून सांगितलें जोशीबुवा आर्ती झाली चला; म्हटल्यावर देहभानावर येऊन चाललों. परंतु एकाग्र दृष्टी झालेली छाया अदृष्ट होईना व पुनः पुनः मन हें काय आहे हें जाणण्याविषयीं आतूर झालें. याप्रमाणें सांज सकाळ तीन दिवस अनुभव झाल्यावर सदरचे रा. स. गाडगीळ अण्णासाहेब यांना विचारतां ते म्हणाले ' बाबा अशाच गंमती करतात त्या उगाच पहाव्या म्हणजे झालें ' या जीवाची पूर्वापार जगांत निरपेक्षबुद्धी व निर्व्याज प्रेम ठेवून प्रत्येक चराचर वस्तुमात्रांत जग निर्माणकर्त्या आदिनारायणाचें वास्तव्य कसें आहे, व सच्यापसव्य अंतर्बाह्य दृश्यादृश्य राहून कसे कसे पार्ट करून आपल्या करमणूकी करून घेत आहे; हें पाह-ण्यांत हा जीव निरंतर गुंतून गेल्यामुळें याचे नांवू अपेक्षा या दोनही शब्दांस कायमचाच फांटा मिळाला आहे. नंतर राहिलेलें कर्तव्य देह प्राक्तन यांची वाट पाहून आलेले सुखदुःखाचे विवेचन न करतां श्रीनारा-यणचरणीं सर्व कर्में व त्यांची फलश्रुती अर्पण करून मनास मुक्त ठेवा-वयाचें असा कार्यक्रम असोन याच्या दृढाभ्यासानें हा देह परमेश्वर स्वरूपी जगाचा आमरणपर्यंत कायमचा दास झाला यांतच या जीवास आनंद वाटतो, नव्हे परमानंदांत मग्न आहे. परंतु सर्व कामिक जनाविरुद्ध ही गोष्ट असल्यामुळें या जीवानें रा.बं साठे यांचेकडे जाण्याची परवानगी मागितली असतां 'बाबांची परवानगी घेतल्याशिवाय जाणें होणार नाहीं' म्हणाले व दुसरे सेवेकरी म्हणाले 'अहो बाबांकडे कांहीं मागा.' परंतु या जीवाची दर्शनाशिवाय कांहींच इच्छा नसल्यामुळें मला कांहीं मागावयाचें नाहीं, फक्त दर्शनाची फार दिवसांची असलेली इच्छा परिपूर्ण झाल्यामुळें परमानंद झाला व देहाचें साफल्य झालें म्हणालों. तरी विशेष आग्रहावरून या जीवानें त्यांनाच प्रार्थना करण्यास म्हटलें कीं, श्रीसत्यनारायण कंपनी दुकानावर या जिवाचा उदरनिर्वाह चालला आहे तोच चालण्याचा आशिर्वाद मागा म्हटल्यावरून त्यांनी सर्व मंडळीसमक्ष दोन प्रहरीं

दोनच्या सुमारास या जीवाची मागणी रा. रा. गाडगीळ यांचे पाव्हणे या नात्यानें श्री बाबांचे पुढें मांडली. नंतर कंपनी नांव न काढतां फक्त धंदाची उपलब्धि करून सदर सेवेकरी गृहस्थांनीं प्रार्थना केली असतां श्रीबाबा म्हणाले 'यांना नारायणांनीं चटणी भाकरीस कांहीं कमी केलें आहे काय' त्यांना विचारा व 'त्यांची इच्छा नसतां तुम्हीं बळजबरी कां'. करतां असें म्हणतांच मंडळी आश्चर्यचकीत झाली.

नंतर या देहास जाण्याची परवानगी मागण्यांत आली, त्यावेळी म्हणाले अशा प्रकारच्या निरपेक्ष जीवांना येण्याच्या व जाण्याच्या परवानगीची जरूरी नाहीं त्यांनीं वाटेल त्या वेळीं यावें व वाटेल त्या वेळीं जावें सदर वेळीं गुरुवार तेथें पडला त्या वेळीं दोन प्रहरीं रा. रा. गाडगीळ म्हणाले, 'जोशीबुवा येथला प्रसाद कांहीं बरोबर न्यावा' म्हणून पुजारी जोग यांचेकडे प्रसाद मागण्यास गेलों. त्यावेळीं प्रत्येकास एक बर्फीचा तुकडा याप्रमाणें तीन इसमांस तीन तुकडे या देहाचे हातीं पडले. मुक्कामाचे जागीं गाडगीळ अण्णासाहेब वगैरे मंडळीसमोर तुकड्यासह आल्यावर तेच म्हणाले 'एवढा प्रसाद पुरणार नाहीं आणखी आठ आणे घेऊन जा व बर्फी घेऊन या' शिर्डीतील सर्व प्रसाद बाबांचा आहे म्हणून निघालों असतां वाटेतच एक इसम बर्फीचें ताट भरून श्रीबाबांनी गाडगीळ यांचे पाहुण्यास नेऊन देण्यास सांगितलेला याची गांठ पडून त्यांनी परतविलें व हा देह परत फिरला. सदर गाडगीळ व हा देह यांना आश्चर्य वाटून इकडील वृत्तांत अल्पावधींत त्यांना कसा कळला व ताबडतोब त्यांना योजना नेमकीच कशी केली याबद्दल आनंदाश्रु निघाल्यावाचून राहिले नाहींत नंतर बाजारचा दिवस असल्यामुळें ओल्या भुईमुगशेंगा थोड्या नमुन्यादाखल पासरी सुमार आलेल्या मंडळीनें चट्ट केल्यामुळें रा.रा. गाडगीळ यांनी एक रुपया देऊन आणखी शेंगा आणण्यास मनुष्य पाठविला त्याला रा. रा. तात्यासाहेब यांनीं अटक करून विचारलें कीं, कोठें जातोस त्यानें 'शेंगा गाडगीळाचे पाहुण्यास आणण्यास चाललों' म्हणतांच ते म्हणाले कीं, श्री बाबांची आज्ञा झाली आहे कीं, प्रथम आलेल्या दोन पोती शेंगा, पैकीं सुमार अर्धमण म्हणजे दोन टोपल्या शेंगा गाडगीळ व त्याचे पाहुणे यांना खाण्याकरितां या नंतर ते नेण्यास मागतील तितक्या देऊन बाकीच्या इतर गोरगरिबांस वाटून टाका असे म्हटल्यावरून तोच मनुष्य शेंगा व रुपयासह परत

आला. हें पाहून मंडळीस आनंदाचा उमाळा आला व श्री बाबा बसून काय काय खेळ करतात व त्यांचें सर्वांतरयामी कसें वास्तव्य आहे याचें चांगलेंच दिग्दर्शन होऊन सर्व मंडळीचे नेत्रांत आनंदाश्रू आल्याविना राहिले नाहीत. या स्मरणानें व त्यांचा फोटो या जीवाचें नित्य गीता पाठाचे प्रथम पृष्ठांत ठेवल्यामुळें नित्य दर्शनाचा योग घडतो हें या जीवाचें परमभाग्य समजावयाचें अशाप्रकारांत व आनंदांत हा देह परत सोलापुरी आल्यावर परमभक्त व श्रद्धाळू जीव व्ही. एस्. फोटोग्राफर फारच भाविक व विश्वासू इतका की त्यांचे देहाचें या प्रेमांत अखेर देहावसान झालें परंतु प्रेम व श्रद्धा सुटली नाही. अशा भाविक जीवास या देहानें श्री बाबांचे दर्शनास जाण्यास सल्ला दिली व मागील खर्चाची रुपये दहाची भिक्षा दिली व सांगितलें की रुपये दहा गेले तर जाऊं दे परंतु एकवार दर्शन करून ये व जमल्यास फोटोचें कार्य करून ये म्हणताच तावडतोब जाण्याची तयारी करून सदर भाविक जीव तेथें या देहाचे पत्रासह दाखल झाला. नंतर तेथील रा. बा. साठे व गाडगीळ या मंडळींनी या इसमाची उत्तम व्यवस्था करून श्री बाबांचें दर्शन करविलें. नंतर त्यांचा जुलमानें चुकवून घेतलेला पूर्वीचा फोटोग्राफ होताच परंतु या इसमाचें दर्शन झाल्यावर श्री बाबा आपण होऊनच म्हणाले "अरे तुला सत्यनारायण कंपनीचे जोशी बुवांनी फोटो घेण्यास पाठविले आहे ना मग बसलास का तुला कसला पाहिजे तसा फोटो घे" म्हणून श्रीबाबांनीं संतोषानें व आनंदानें बसल्याचा व उभ्याचा असे फोटो काढूं दिल्या बद्दल सर्व मंडळीस मोठें नवल वाटलें फोटो काढून झाल्यावर चार दिवस त्याला ठेवून घेऊन श्रीबाबांनी उपदेश केला की तूं फोटोची किंमत वाजवीपेक्षां जास्त घेऊं नको; कारण तूं सत्यनारायण कंपनीच्या जोशी बुवांचा पट्टशिष्य आहेस ते तुला किंमत कधींही घेऊं देणार नाहीत व त्यांचेच आशिर्वादानें तुझें कल्याण होणार आहे, म्हणून तेथें निघालेल्या दक्षिणाभिक्षा संस्थेमध्यें सदर फोटोग्राफरचें नांव रजिस्टर करून त्याला कांहीं फोटोची आर्डर पण देण्यांत आली. व जाण्यायेण्याचे खर्चासुद्धां रक्कम देऊन श्री बाबांचेच परवानगीनें फोटोग्राफरची रवानगी करण्यांत आली. त्याप्रमाणें त्या संस्थेस फोटो रवाना मागव दराने करण्यांत आले

श्रीकृष्णार्पणमस्तु

## स्फुट विषयः

## आतांपर्यंत छापून आलेल्या महाराजांच्या लीला.

एकदां एक वकील शिर्डीस आले होते. ते मशिदींत गेले व बाबांच्या पायां पडले व त्यांना दक्षिणा देऊन खालीं बसले. ते बसल्याबरोबर महाराजांनीं त्यांच्याकडे तोंड करून असे उद्गार काढले " काय लोक लबाड असतात, पाया पडतात, दक्षणा देतात आणि आंतून शिव्याहि देतात.

नंतर वाड्यांत गेल्यानंतर वकीलसाहेब मला सांगूं लागले " महाराजांनीं मजवर ताशेरा झाडला तो अगदीं बरोबर आहे आमच्या येथील मुन्सफसाहेब आजारीपणाची रजा घेऊन शरीरप्रकृति सुधारण्यासाठीं निघालेले येथे येऊन राहिल्यामुळें आम्ही वकिलांच्या खोलीत त्यांची बरीच थट्टा करीत होतो, आणि महाराजांची निंदाहि करीत होतो, त्याची खूण महाराजांनीं दिली. इतःपर मी असें करणार नाहीं. "

---अशा तऱ्हेचे शेंकडों अनुभव नित्यशः येतात आणि त्यावरून मनांत असें वाणलें कीं, आपण कोठही कांहींही केलें तरी महाराजांस तें अंतर्ज्ञानानें कळतें. असेही अनुभव आले आहेत कीं, कोणासंबंधानें आपल्या मनांत नुसता वाईट विचार जरी आला आणि जरी कोणाजवळ आपण त्याचा उच्चार केला नाहीं, तरी तो महाराजांस कळतो. हे मनांस वाणलें म्हणजे साहजिकच आपल्या-आचरणावर त्याचा परिणाम होतो. अर्थात् कैक जन्माचे संस्कार एकदम जात नाहींत; पण हळुहळु वृत्ति निवळूं लागते आणि कालांतरानें तरी, जन्मांतरांनीं कां होईना, वृत्ति पूर्ण निर्मळ होईल असा भरंवसा वाटतो.

महाराजांचे सर्वसाक्षीत्व वाणलें म्हणजे दुसरा फायदा होतो तो असा. मनाला अशा तऱ्हेचा धीर वाटतो. असें वाटूं लागतें कीं, आपले बाबा आपल्याला संभाळायाला नेहमीं जवळच आहेत, आणि आपल्याला भिण्याचें कांहीं कारण नाहीं. एकदां माझे एक मित्र रात्रीं बहिर्दिशेला गेले असतां त्यांना सरसर असा आवाज ऐकूं आला. अर्थात् त्यांना वाटलें, कीं, एखादा साप येत आहे. साहजिकच ते घाबरले; पण साप-

चीप कांहीं निघाला नाहीं. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ते माझे मित्र बाबांचे भेटीला गेले आणि पायां पडूं लागले, तेव्हां बाबा म्हणाले " अरे, त्यावें कां? तूं परसाकडला गेलास तरी मी तेथें नसतों काय?"

एकदां एक मुसलमान डॉक्टर शिर्डीस येऊन राहिला होता. तो शिर्डीस येऊन राहिल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्याच्यावर जळगांव कोर्टांत फौजदारी खटला कोणी दाखल केला, व त्याचें समन्स त्याला शिर्डीला लागलें. तारखेच्या आदल्या दिवशीं श्रींच्याजवळ जळगांवाला जाण्याची परवानगी तो मागूं लागला, तेव्हां श्री ह्मणाले " आज जाऊं नकोस, उद्यां जा."

त्यानें सांगितलें " बाबा, आज गेलों तरच तारखेला जाऊन पोहों-चेन. उद्यां गेलों तर उशीर होईल."

श्री ह्मणाले " कांहीं काळजी करूं नकोस. तूं आज न जातां उद्यांच जा."

असें महाराजांचें आश्वासन मिळाल्यावर तो अर्थात् राहिला आणि दुसऱ्या दिवशीं गेला. तो परत आल्यावर सांगूं लागला, आदल्या दिवशीं खटला निघालाच नाहीं. मॅजिस्ट्रेट साहेबांनीं दुसऱ्या दिवशीं घेतला, आणि फिर्यादी व त्याचे साक्षीदार यांची उलट–तपासणी–स्वत: मॅजिस्ट्रेटसाहेबांनींच करून आरोपीस म्हणजे डॉक्टराला सोडून दिलें, आणि फिर्यादीकडून त्याला नुकसान देवविलें. अर्थात् डॉक्टराला फार आनंद झाला, आणि त्यानें महाराजांकडे परत आल्यावर पेढे वाटले, आणि ते वांटीत असतां वरील हकीकत त्यानें मला सांगितली. डॉक्टर आणखी असेंहि म्हणाला, कीं, " खटला चालला असतां पहिल्यापासून अखेरपर्यंत महाराज मॅजिस्ट्रेटच्या जवळ खुर्चीवर बसले आहेत, असें मला दिसत होतें." हा त्याचा भास असेल; पण निरनिराळ्या गांवीं व निरनिराळ्या वेळीं जागृतावस्थेंत आपणास महाराजांचे उघड दर्शन झाल्याचें पुष्कळ विश्वासपात्र लोक सांगतात. पण ही कदाचित् त्यांच्या मनाची भावना किंवा कल्पना असेल, असें ह्मणतां येण्यासारखें असल्यामुळें तशीं उदाहरणें येथें देत नाहीं.

श्री साईबाबा प्रसन्न.

विले–पार्लें, येथें श्रीसाईहनुमान नांवाचें सुंदर नवीन मंदिर आहे. त्या ठिकाणी हनुमज्जयंत्युत्सवांत रविवार ता. ४।४।२० रोजीं कीर्तनाचे आरंभीं कीर्तनकार रा. रा. कृष्णाजी वासुदेव खरे यांनी स्वरचित म्हटलेलें अष्टक.

# श्रीसाईहनुमानाष्टक.

॥ श्लोक ॥

श्रीसाई यत्प्रसादें, रमणिय अशी, मूर्ति सन्मूख ठेली ॥
वाटे पश्चीम देशीं, मठ करुनियां, देवता स्थापियेली ॥
भक्तांच्या पूरवाया, सकलहि मनिषा, वाट पाहे कृपेनें ॥
तो साईहनुमान प्रेम भरुनी, पाहूं चला दृष्टिनें ॥ १ ॥

सानंदें, वरदहस्ता करुनि जवळि जो, वाटतें वाहताहे ॥
होवोनी कर्मयोगी. निजहित सकलां, साधण्या सांगताहे ॥
कर्मी दक्ष परी, उदास स्वमनीं, राहोनिया आचरा ॥
ध्यानीं आणोनि बोलां, निशिदिनि अहो, त्या रामदासा स्मरा ॥२

ईशप्रेम असें अगीं भरियलें, कोंदोनि चित्शक्तिनें ॥
त्या ईशस्वरुपाविणे स्थिरचरीं, देखेचि ना दृष्टिनें ॥
पाहीं येथुनि तेथही वरचि तो, भासे हरी आपणा ॥
शैलाच्या शिखरीं, सखोल कुहरीं, सर्वत्र त्यातें पहा ॥३॥

हरुनि सकल तापा, सौख्य द्याया जिवांसी ॥
निकट तटिं उभा जो, **पारलाग्रामवासी** ॥

सुरुचिर रमणी ही, मूर्ती ती पाहण्याला ॥
निशिदिनिं मन घेवो, तेथही धांवण्याला ॥४॥

नुरली भक्तिविणेंच अन्य मनिषा, हा बोध होवो मना ॥
भक्तिप्रेमविणेंहि ज्ञान नलगे, हे तो जडो भावना ॥
ज्ञानानें अभिमान नित्यचि नवा, तो आड येईल कीं ॥
भक्ति प्रेमहि एक वस्तुच असे, जी सौख्य देईल कीं ॥ ५ ॥

मार्ग आणी भ्रमं न दूरचि करा, हा भक्तिचा चांगला ॥
सोपा आणि बराच मार्गहि जगीं, संतांहि जो वर्णिला ॥
हा तो देइल सौख्य मोक्ष सफलां, विश्वास याते धरा ॥
श्रीसाईहनुमान होइल कृपा, संदेह नाहीं जरा ॥ ६॥

नमन करित भावें, साईपादांबुजाला ॥
अवडि तुझि सदा दे, वासुदेवात्मजाला ॥
वदत सतत हें मी, भक्ति तूझी करावी ॥
सकल त्यजुनि भावें कास तूझी धरावी ॥ ७ ॥

( केका )

प्रसन्न वदनें पहा, प्रभु जराहि, दीनाकडे ॥
दयाब्धि तुम्हि हो असा, सतत हाचि डंका झडे ॥
असें सतत ऐकतां, दुरि कराल, या पामरां ॥
प्रभो, मग नसे मला, जगिं दुजा खरा आसरा ॥ ८ ॥

मध्यंतरी एक तास । गाडी बसईची यावयास ॥
वाटलें हा अवकाश । लावूं कीं कामास एकादिया ॥ ११६ ॥
जाहली मात्र ऐसी स्फूर्ति । तोंच आली दादरावरती ॥
गाडी एक केवळ वांद्र्यापुरती । ते मग बैसती तियेंत ॥ ११७॥
येतां गाडी निजस्थानीं । निरोप आला मज लागूनी ॥
मग मी भेट घेतां तत्क्षणीं । चालली काहणी शिरडीची ॥११८॥
'केव्हां निघणार साईदर्शना । किमर्थ आळस शिरडी गमना' ॥
'दीर्घ सूत्रता कां प्रस्थाना । निश्चिंती मना कां नाहीं' ॥ ११९ ॥
पाहूनि नानांची आतुरता । मीही शरमलों अपुले चित्ता ॥
परी मनाची झालेली चंचलता । पूर्ण प्रांजळता निवेदिली॥१२०॥
त्यावरी मग नानांचा बोध । कळकळीचा प्रेमळ शुद्ध ॥
परिसतां शिरडीगमनेच्छोद्बोध । अति मोदप्रद जाहला ॥१२१॥
'तात्काळ निघतों' घेतलें वचन । तेव्हांच नानांही केलें प्रयाण॥
मग मीही मागें परतोन । ठेविलें प्रस्थान मुहूर्ता ॥ १२२ ॥
मग सरसामान आवरूनी । सर्व निरवानिरव करूनी ॥
तेच दिवशीं अस्तमानीं । शिरडी लागूनि निघालों ॥१२३॥
सायंकाळा पाठील मेल । दादरावर उभी राहील ॥
म्हणून दादरचेंच भरलें हंशील । तिकीट तेथील घेतलें ॥१२४॥
परी मी गाडींत जाऊन बसतां । वांद्रे स्टेशनीं गाडी असतां ॥
यवन एक गाडी सुटतां । अति चपळता आंत ये ॥ १२५ ॥
[illegible] तोंच आरंभीं कार्याविषात ॥

सर्वे पाहून सरसामान । यवन पुसे मज 'कोठें गमन ?' ॥
तंव म्हणे मी दादरास जाऊन ॥ मेल साधीन मनमाडची ॥१२७॥
तंव तो सुचवी वेळेवर । उतरूं नका हो दादरावर ॥
मेल न तेथें थांबणार । बोरीबंदर गांठावें ॥ १२८ ॥
होती न वेळीं ही सूचना । मेल दादरवर मिळती ना ॥
नकळे मग या चंचल मना । काय कल्पना उठल्या तें ॥१२९॥
परी ते दिवसीं प्रयाणयोग । साधावा ऐसाच होता सुयोग ॥
म्हणोन मध्यंतरीं हा कथाभाग । घडला मनाजोग अवचिता ॥१३०
निकटं भाऊसाहेब दिक्षित । होतेच मार्गप्रतिक्षा करीत ॥
पहयीक नऊ दहाचे आंत । जाहलों शिरडींत सादर ॥ १३१ ॥
इसवी सन एकूणीससें दहा । वर्तमान हें घडलें पहा ॥
एक साठ्यांचाच वाडा तेव्हां । होता रहावयास उतारूंस ॥१३२॥
टांग्यांतून उतरल्यावरी । दर्शनौत्सुक्य दाटलें अंतरीं ॥
कधीं चरण वंदीन शिरीं । आनंद लहरी उसळल्या ॥ १३३ ॥
इतुक्यांत साईंचे परमभक्त । तात्या साहेब नूलकर विख्यात ॥
मशीदींतून आले परत । म्हणती "त्वरित दर्शन घ्या ॥ १३४॥
"आलेच बाबा मंडळींनिशीं । वाडियाचे कोपऱ्यापाशीं ॥
"चला आधीं धूळ भेटीशीं । मग ते लेंडीसी निघतील ॥ १३५ ॥
"पुढें मग करा स्नान । बाबा जों येतात मागें परतोन ॥
"तेव्हां मग मशीदीस जाऊन । स्वस्थ दर्शन घ्या पुन्हां" ॥ १३६ ॥
ऐसें ऐकुन घाई घाई । धांवलों बाबा होते त्या ठाईं ॥
—— घातलें लोटांगण पाईं । आनंद न माई मनांत ॥ १३७ ॥

नाना साहेब सांगून गेले । त्याहून अधिक प्रत्यक्ष पाहिलें ॥
दर्शनें त्या धन्य मानिलें । साफल्य झालें नयनाचें ॥ १३८ ॥
कधीं ऐकिली नाहीं देखिली । मूर्ति पाहूनि दृष्टि निवाली ॥
तहान भूक सारी हरपली । तटस्थ ठेलीं इंद्रियें ॥ १३९ ॥
लाधलों साईचा चरणस्पर्श । पावलों जो परामर्ष ॥
तोच या जीवाचा परमोत्कर्ष । नूतन आयुष्य तेथुनी ॥ १४० ॥
ज्यांचेनि लाधलों हा सत्संग । सुखावलों मी अंग प्रत्यंग ॥
तयांचे ते उपकार अव्यंग । राहोत अभंग मजवर ॥ १४१ ॥
ज्यांचेनि पावलों परमार्थातें । तेच कीं खरें आप्त भ्राते ॥
सोयरे नाहींत तयां परते । ऐसें निज चित्तें मानीं मी ॥१४२॥
केवढा तयांचा उपकार । करूं नेणें मी प्रत्युपकार ॥
म्हणोनि केवळ जोडुनि कर । चरणीं हें शीर ठेवितों ॥ १४३ ॥
साई दर्शन लाभ घडला । माझिया मनींचा विकल्प झडला ॥
वरी साईसमागम घडला । परम प्रकटला आनंद ॥ १४४ ॥
साई दर्शनीं हीच नवाई । दर्शनें वृत्तीस पालट होई ॥
पूर्व कर्माची मावळे सई । वीट विषयीं हळुहळु ॥ १४५ ॥
पूर्व जन्मींचा पापसंचय । कृपावलोकनें झाला क्षय ॥
आशा उपजली आनंद अक्षय । करितील पाय साईचे ॥ १४६ ॥
भाग्यें लाधलों चरणमानस । वायसाचा होई न हंस ॥
साई महंत संतावतंस । परमहंससद्योगी ॥ १४७ ॥
पाप ताप दैन्य विनाशी । ऐसिया साईच्या दर्शनेसी ॥
पुनित आज जहालों मी बहुवसी । पुण्यराशी समागमें ॥१४८॥

पूर्वील कित्येक जन्मांच्या गांठी । ती ही साईमहाराज भेटी ॥
हा साई एक मीनलिया दृष्टी । सकल सृष्टी साईरूप ॥१४९॥
येतांच शिरडीस प्रथम दिवशीं । बाळासाहेब भाटयापाशीं ॥
आरंभ झाला वादावादीशीं । गुरु काशासी व्हावा कीं ॥१५०॥
बुडवून अपुली स्वतंत्रता । ओढूनि घ्यावी कां परतंत्रता ॥
जेथें निज कर्तव्यदक्षता । काय अवश्यकता गुरूची ॥१५१॥
ज्याचें त्यानेंच केलें पाहिजे । न करी त्यास गुरुनें काय कीजे॥
न हालवितां हात पाय जो निजे । तयास दीजे काय कवणें॥१५२
हाच माझा पक्ष ऋजू । प्रतिपक्षाची विरुद्ध बाजू ॥
दुराग्रहाचाच तो तराजू । वाद माजून राहिला ॥ १५३ ॥
अंगीं दुर्धर देहाभिमान । तेणेंच वादावादीचें जनन ॥
अहंभावाची ही खूण । नाहीं त्यावीण वाद जगीं ॥ १५४ ॥
प्रतिपक्षाचें निश्चित मत । हो का पंडित वेद पारंगत ॥
पुर्वानुग्रहाव्यतिरिक्त । पुस्तकी मुक्त केवळ तो ॥ १५५ ॥
दैव थोर कीं कर्तृत्व थोर । वाद चालला हा घनघोर ॥
केवळ दैवावर टाकून भार । काय हो होणार मी ह्मणें ॥१५६॥
तंव बोले विरुद्ध पक्षकार । होणारासि नाहीं प्रतिकार ॥
होण्यमाण नाहीं टळणार । मी मी म्हणणार भागले ॥ १५७॥
दैवापुढें कोण जाई । एक करितां एक होई ॥
ठेवा तुमची ही चतुराई । अभिमान ठायीं पडेना ॥ १५८ ॥
मी ह्मणे हो ह्मणतां कसें हें । कराल त्याचेंच सर्व आहे ॥
आळशापरी बैसून राहे । दैव साहे कैसें तें ॥ १५९ ॥

" उद्धरेदात्मनात्मानं "। गर्जे स्वयें स्मृति वचन ॥
त्याचा अनादर करून । तरून जाणें अशक्य ॥ १६० ॥
हें ज्याचे त्यानेंच करावें लागे । लागावें किमर्थ गुरूचे मागें ॥
आपण असल्यावीण जागे । गुरूनें भागे कैसेनी ॥ १६१ ॥
आपुली सदसद्विचार बुद्धि। आपुलें साधन चित्तशुद्धि ॥
तें झुगारुनि देईल जो कुबुद्धि । गुरु काय सिद्धि देई त्या ॥१६२॥
या वादाचाअंत नाहीं। निष्पन्न कांहीं जाहलें नाहीं ॥
चित्त स्वास्थ्यास अंतरलों पाहीं। हेच कमाई म्यां केली ॥१६३॥
ऐसा वाद घालितां घालितां । कोणीही ना तिळभर थकतां ॥
ऐशा दोन घटका लोटतां । वाद आटपता घेतला ॥ १६४ ॥
पुढें मंडळी समवेत । आम्ही जातों जों मशीदींत ॥
बाबा काका साहेबांप्रत। परिसा पुसत काय तें ॥ १६५ ॥
'काय चाललें होतें वाड्यांत । वाद कशाचा होता मांडत ॥
'काय ह्मणाले हे हेमाडपंत' । मजकडे पाहत बोलले ॥१६६॥
वाड्यापासून मशीदीपर्यंत । मध्यंतरी अंतर बहुत ॥
बाबांस कळलें कैसें हें वृत्त। आश्चर्य चकित मी मनीं ॥१६७॥
असो ऐसा मी वाग्बाण हत । जाहलों निःशब्द लज्जावनत ॥
पहिल्याच भेटीस कीं हे अनुचित । घडलें अविहित मजकरवी॥१६८
हें हेमाडपंतनामकरण । प्रातःकाळींचा वाद या कारण ॥
तेणेंच बाबांस हेमाडस्मरण । मनीं मी खूण बांधिली ॥१६९॥
देवगिरीचे राजे यादव । हेच ते दौलताबादींचें जाधव ॥
तेरावे शतकीं राज्य वैभव । वाढविलें गौरव महाराष्ट्राचें ॥१७०॥

" प्रौढ प्रतापचक्रवर्ती "[1] । महादेव नामा भूपती ॥
पुतण्या तयाचा पुण्यकीर्ती । विक्रमें प्रख्याती पावला ॥१७१॥
तोही यदुवंश चुडामणी । रामराजा राजाग्रणी ॥
मंत्री या उभयांचा बहुगुणी । सर्व लक्षणी हेमाद्री[2] ॥ १७२॥
तो धर्मशास्त्र ग्रंथकार । ब्रह्मवृन्दार्थ परमे उदार ॥
आचार व्यवस्था संगतवार । आरंभीं रचणार हेमाद्री ॥१७३॥
व्रतदानतीर्थमोक्षखाणीं । नामें 'चतुर्वर्गचिंतामणी'[3] ॥
ग्रंथ रचिला हेमाद्रींनीं । विख्यात करणी तयाची ॥ १७४ ॥
गीर्वाण भाषेंत हेमाद्रिपंत । तोच प्राकृतीं हेमाडपंत ॥
मुत्सद्दी राजकारण निष्णात । होता विख्यात ते काळीं॥१७५॥
परी तो वत्स मी भारद्वाज गोत्री । तो पंच मी तीन प्रवरी॥
तो यजुर्मी ऋग्वेदाधिकारी । तो धर्मशास्त्री मी मूढ ॥१७६॥
तो माध्यंदिन मी शाकल । तो धर्मज्ञ मी बाष्कल ॥
तो पंडित मी मूर्ख अकुशल । कां मज पोकळ ही पदवी ॥१७७॥
तो राजकारण धुरंधर मुत्सद्दी । मी अल्पमती मंदबुद्धि ॥
त्याची राजप्रशस्ति[4] प्रसिद्धि । ओवीन साधी मज घडवे॥१७८॥
तो ग्रंथकारकलाभिज्ञ । मी तो ऐसा ठोंबा अज्ञ ॥
तो धर्मशास्त्र विशारद सुज्ञ । मी अल्पप्रज्ञ हा ऐसा ॥ १७९ ॥

१ पंढरपूर येथें शके ११९२ प्रमोदनाम संवत्सर या मितीचा एक कोरीव लेख आहे त्या लेखांत या महादेव भूपतीस हें विशेषण योजिलेलें आहे.

२ हेमाडपंतानें रोज शेकडो ब्राह्मण जेऊं घालावेत अशी त्याची आज्ञा आहे.

३ ज्याच्यांत व्रत, दान, तीर्थ आणि मोक्ष या चार प्रकरणांचें सविस्तर विवेचन केलें आहे, असा हा चतुर्वर्ग चिंतामणि नामक ग्रंथ आहे.

४ या नांवाचें हेमाडपंतांचें एक संस्कृत काव्य आहे.

कृष्ण परब्रह्माचें रूपडें । तयासही गुरु करणें पडे ॥
सांदीपनीच्या गृहीं लांकडें । सोसूनि सांकडें वाहिलीं ॥१९०॥
तेथें माझी काय मात । वादावादी करावी किमर्थ ॥
गुरुवीण ज्ञान वा परमार्थ । नाहीं हा शास्त्रार्थ दृढ केला ॥१९१॥
वादावादी नाहीं बरी । नको कुणाची बरोबरी ॥
नसतां श्रद्धा आणी सबूरी । परमार्थ तिळभरी साधेना ॥१९२॥
हेंही पुढें आलें अनुभवा । ये रीती या नामगौरवा ॥
प्रेम पुरःसर निजसद्भावा । शुद्ध स्वभावा आदरिलें ॥१९३॥
आतां असो हें कथानक । स्वपक्षपरपक्षविच्छेदक ॥
वाद प्रवाद निवर्तक । सर्वांसही बोधक समसाम्यें ॥१९४॥
असो ऐसें हे ग्रंथप्रयोजन । अधिकारीअनुबंधनंदर्शन ॥
ग्रंथकाराचें नामकरण । कथन श्रवण करविलें ॥ १९५ ॥
पुरे आतां हा अध्याय विस्तार । हेमाड साई चरणीं सादर ॥
पुढें यथानुक्रम कथा सविस्तर । श्रवणतत्पर व्हावें जी ॥१९६॥
साईच अपुली सुखसंपत्ती । साईच अपुली सुखसंवित्ती ॥
साईच अपुली परम निवृत्ति । अंतिम गती श्रोतयां ॥१९७॥
साई कृपेचिया कारणें । साई चरित्र श्रवण करणें ॥
तेणेंच दुस्तर भवार्णव तरणें । कलिमल हरणें निर्मूळ ॥१९८॥
इति श्री संतसज्जन प्रेरितें । भक्त हेमाडपंत विरचितें ॥
श्री साईसमर्थ सच्चरितें । कथा प्रयोजन नामकरणं
नाम द्वितीयोध्यायः संपूर्णः ॥
श्रीसद्गुरु साईनाथार्पणमस्तु शुभंभवतु ॥

# अध्याय ३ रा.

श्रीगणेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥

श्री कुलदेवतायै नमः ॥ श्री सीतारामचंद्राभ्यां नमः ॥

श्री सद्गुरू साईनाथाय नमः ॥

आतां पूर्व कथेची संगती । साई पूर्ण आश्वासन देती ॥
म्हणती आपुली संपूर्ण अनुमती । चरित्र स्थिती वर्णावया ॥१॥
तुम्ही आपुलें कार्य करा । मनीं यत्किंचितही न कचरा ॥
विश्वास पूर्ण मद्वचनीं धरा । निर्धार करा मनाचा ॥ २ ॥
केलिया मल्लीलेचें लेखन । होईल अविद्यादोषनिरसन ॥
भक्तिभावें करितां श्रवण । प्रपंचभान मावळेल ॥ ३ ॥
उठतील श्रवण सागरावरी । भक्तिप्रेमामृताच्या लहरी ॥
बुडिया देतां उपरा उपरी । येतील करीं बोधरत्नें ॥ ४ ॥
ऐकोनि निःशंक झालें मन । साईपदीं केलें नमन ॥
मग हें चरित्रलेखन । यथा स्मरण आरंभीं ॥ ५ ॥
हे शब्द येतांच बाबांचे ओठीं । तेंच बांधिली शकुन गांठी ॥
घडून येणार आतां हे गोष्टी ॥ मी तों वेठीचा बिगारी ॥६॥
पहा अगम्य हरीची लीला । त्यावीण न कळे ती अन्याला ॥
श्रुति शास्त्र वेद मूकावला । थांग लागला ना कोणा ॥७॥
शास्त्र विशारद वेद वादी । प्रज्ञावंत पंडितादी ॥
जल्पवादिवादसंवादी । यांच्या नादीं भरूं नका ॥ ८ ॥

हरी निजभक्तांचा केला । भाळ्या भोळियांचा भुकेला ॥
प्रेमालागीं समूळ विकला । सदा हटेला दाविकां ॥ ९ ॥
यांतचि तुमचें कल्याण आहे । माझेंही अवतारसार्थक्य हें ॥
माझी तों घोकणी नित्य पाहें । काळजी वाहें हेच मी ॥१०॥
वरी एक सांगतों शामा[१] । प्रेमें घेईल जो मन्नामा ॥
तयाच्या मी सकल कामा । पुरवीं प्रेमा वाढवीं ॥ ११ ॥
मग जो गाई वाडे कोडें । माझें चरित्र माझे पवाडे ॥
तयाचिया मी मागें पुढें । चोहींकडे उभाच ॥ १२ ॥
जे जे भक्त मजकारणें । असतील विनटले जीवें प्राणें ॥
तयांसी या कथाश्रवणें । आनंद होणें सहजीच ॥ १३ ॥
कोणीही केल्या माझें कीर्तन । तयासीं देईन आनंद घन ॥
नित्य सौख्य समाधान । सत्य वचन मानावें ॥ १४ ॥
जो मजलागी अनन्य शरण । विश्वासयुक्त करी भजन ॥
माझें चिंतन माझें स्मरण । तयाचें उद्धरण ब्रीद माझें ॥१५॥
माझें नाम माझी भक्ती । माझें दफ्तर माझी पोथी ॥
माझें ध्यान अक्षय चित्तीं । विषयस्फूर्ती कैंची त्या ॥ १६ ॥
कृतांताच्या दाढेंतून । काढीन मी निजभक्ता ओढून ॥
करितां केवळ मत्कथा श्रवण । रोगनिरसन होईल ॥ १७ ॥
कथा करा सादर श्रवण । त्यावरी करा पूर्ण मनन ॥
मननावरी निदिध्यासन । समाधान पावाल ॥ १८ ॥
अहं सोहं जाईल विरोन । उन्मन होईल श्रोतियांचें मन ॥
चित्त होईल चैतन्यघन । अनन्य परिपूर्ण श्रद्धेनें ॥ १९ ॥

१ रा. रा. माधवराव देशपांडे यांस बाबा नेहमीं या नांवानें हाक मारीत.

साई साईति नामस्मरण । करील सकल कलिमलदहन ॥
वाणीश्रवणगतपापभंजन । एक लोटांगण घालितां ॥ २० ॥

कार्य जरी नव्हे सामान्य । आज्ञा केली शिरसामान्य ॥
बाबांसारिखा असतां वदान्य । कां पां दैन्य आदरावें ॥ २१॥

कोणा हातीं बांधविलीं राउळें । कोणास कीर्तनरंगीं लाविलें॥
कोणास तीर्थयात्रे धाडिलें । मज बैसविलें लिहावया ॥२२॥

अल्पज्ञानीस मी पामर । करवील गुणें हा करुणासागर ॥
आपण निमित्तमात्र तर । मी तर कांहीं जाणेना ॥२३॥

आणि पुरुषपणा नवलावा । कीं जेथ कांहीं न लव ओलावा ॥
तेथें हा निजकर तळ फुलावा । झाड उफलावा अभयातें ॥२४॥

कोणी पूजा बांधिली थाट । कोणी देवालयें कोणी घाट ॥
आपणी पडे बांधित बाट । चरित्रपाठ साईचा ॥ २५ ॥

कोणी सत्कारपूर्वक अर्चन । कोणी करिती पादसंवाहन ॥
उत्कंठित झालें माझें मन । गुणसंकीर्तन करावें ॥ २६ ॥

कृतयुगीं जें प्राप्त ध्यानें । त्रेतीं यजनें द्वापरीं अर्चनें ॥
तें प्राप्त सर्व नामसंकीर्तनें । गुरुभजनें कलियुगीं ॥ २७ ॥

अनधिकारी उघड उघड । चिंध्या भाराभर एक ना धड ॥
तेणें ऐसें हें अवजड । कार्य अवघड घ्यावें कां ॥ २८ ॥

यत्न न करितां उगें बसावें । आज्ञाभंगपातकी व्हावें ॥
आज्ञापालन करूं जावें । तरी व्हावें हें कैसें ॥ २९ ॥

समर्थ साईंची निजस्थिति । यथार्थ वर्णाया कोणा गति ॥
स्वयेंच भक्तार्थ कृपा करिती । तरी ते वदविती स्वयेंच ॥३०॥

वाणीची जेथ न चले धांव । तेथें मी कां बांधिली हांव ॥
ऐसें बोलावयास वाव । ठेविला न ठाव कवणातें ॥ ३१ ॥
उचलिली जेव्हां हातीं लेखण । बाबांनीं हरिलें माझें मीपण ॥
लिहिती आपुली कथा आपण । ज्याचें भूषण त्याजला ॥३२॥
हें तों संतचरित्रलेखन । संतांवीण करील कोण ॥
बाबांच्या अतर्क्य गुणांचें आकलन।गगनाआलिंगन दानासम३३
अतिगहन तयाचें महिमान । वर्णावयास मी मतिहीन ॥
त्यांनींच उकलून आपुलें आपण । निर्मुक्तवचन व्हावें कीं ॥३४॥
बाबा जरी मी जन्मतः ब्राह्मण । तरी श्रुतिस्मृतिनेत्रविहीन ॥
जरी हें या जन्मा दूषण । परी मज भूषण आपुलें ॥ ३५ ॥
श्रुतिस्मृति हे ब्राह्मणनयन । काणा तो जो एकें हीन ॥
अंधचि तो जो उभयविहीन । हीन दीन तैसा मी ॥ ३६ ॥
आपण मज अंधाची काठी । असतां मज काय आटाटी ॥
टेकीत टेकीत पाठीपाठी । धोपट वाटे चालेन ॥ ३७ ॥
आतां पुढारा काय करावें । मज पामरा नाहीं ठावें ॥
आपणचि बुद्धिदायक व्हावें । संपादावें निज कार्य ॥ ३८॥
मुके बृहस्पतिसम बोलती । पंगू मेरूपर्वत लंघिती ॥
ही जयाची अतर्क्य शक्ति । तयांची युक्ति त्यां ठावी ॥३९॥
मी तों केवळ पायांचा दास । नका करूं मजला उदास ॥
जोंवरी या देहीं सास[1] । निजकार्यास साधून घ्या ॥ ४० ॥
आतां आपण श्रोते जन । जाणितलें जी ग्रंथप्रयोजन ॥
साईच लिहिता लिहविता आपण । भक्त कल्याणा कारणें॥४१॥

---

१ श्वास

कैसा वाजेल पावा कीं पेटी । चिंता नाहीं उभयां पोटीं ॥
ही तो वाजवित्या अटाटी । आपण कष्टी कां व्हावें ॥४२॥

कीं जें चंद्रकांत स्रवत । तें काय तया पोटींचें अमृत ॥
ती तों चंद्राची करामत । चंद्रनिर्मित चंद्रोदयीं ॥ ४३ ॥

किंवा सागरा ये भरती । ती काय त्याची निजकृति ॥
तीही चंद्रोदयाचे हातीं । सागरकृति नव्हे ती ॥ ४४ ॥

असो टाळोनि भंवरे खडक । सागरीं नावा चालाव्या तडक ॥
ह्मणोनि जैसे लालभडक । दीप निदर्शक लाविती ॥ ४५ ॥

तैशाच साईनाथांच्या कथा । ज्या गोडीनें हिणवितील अमृता ॥
भवसागरींचे दुस्तर पंथा । अति सुतरता आणितील ॥ ४६ ॥

धन्य धन्य या संतकथा । श्रवणद्वारें अंतरीं रिघतां ॥
बाहेर निघे देहाभिमानता । द्वंद्ववार्ता नुरेच ॥ ४७ ॥

जंव जंव यांचा हृदयीं साठा । तंव तंव विकल्प पळे बारा वाटा ॥
ज्ञान संचय होय लाठा । उतरे ताठा देहाचा ॥ ४८ ॥

बाबांच्या शुद्ध यशाचें वर्णन । प्रेमें तयाचें श्रवण ॥
होईल भक्तकल्मलदहन । सोपें साधन परमार्था ॥ ४९ ॥

मायातीत ब्रह्म काय । काय तत्तरणार्थ उपाय ॥
कर्म धर्माचरणें हरि हा प्रिय । कैसेनि होय निजभक्तां ॥५०॥

आत्यंतिक क्षेम तें काय । भक्ति मुक्ति विरक्ति काय ॥
वर्णाश्रमधर्म वस्तु अद्वय । इत्यादि विषय अति गूढ ॥ ५१ ॥

एतदर्थ अर्थांत गोष्टी । नर्मामीं पुरवाया निज आवडी ॥
ज्ञानोबा एकनाथादि कृत ग्रंथ परवडी । सुख निरवडी सेवावी५२

कृत युगीं शमदम । त्रेतीं यजन द्वापरीं पूजन ॥
कलियुगीं नामकथाकीर्तन । स्वल्प साधन परमार्थी ॥ ५३ ॥
ब्राह्मणादि चारीवर्ण । सर्वांसी साधन गुरुकथाश्रवण ॥
असो स्त्री शुद्र वा जातिहीन । हें एक साधन सकळांतें ॥५४॥
असेल जयाचे पुण्य पदरीं । तोच या कथा श्रवण करी ॥
कोणास येतील निद्रालहरी । तयांही श्रीहरी जागवील ॥५५॥
व्हावे विषय भोग अनवरत । ते न लाभतां जे दीनचित्त ॥
तयांसीही हें संतकथामृत । विषयनिर्मुक्त करील ॥ ५६ ॥
योग याग ध्यान धारणा । करूं जातां प्रयास नाना ॥
आयास नलगे या कथाश्रवणा । एका अवधानावांचून ॥ ५७ ॥
ऐसीही साईंची कथा निर्मळ । परिसोत सज्जन श्रोते प्रेमळ ॥
जळतील पंच महापापें प्रबळ । जातील समूळ विलयाला ॥५८॥
आह्मां भवपाशीं जखडिलें । तेणें निजरूप वेढिलें ॥
श्रवणें ते वेढे होतील ढिले । स्वरूप पहिलें लाधेल ॥५९॥
व्हावें कथांचें आमरण स्मरण । घडावें तयांचें नित्य परिशीलन ॥
होवो भवद्वार्ता शांतवन । समाधान जीवांचें ॥ ६० ॥
वाचतां परिसतां भक्तिभावें । सहज साईंचें ध्यान व्हावें ॥
सगुणरूप डोळां दिसावें । चित्तीं ठसावें दृढतर ॥ ६१ ॥
येणें घडावी सद्गुरुभक्ति । पावावी संसारीं विरक्ति ॥
जडो गुरुस्मरणीं प्रीति । होवो मति निर्मळ ॥ ६२ ॥
ऐसीच बुद्धि धरोनि मनीं । कृपा केली साईनाथांनीं ॥
मज निमित्ता पुढें करोनी । स्वयें करणी हे केली ॥ ६३ ॥

ओटीं तुडुंब लागली ओढी । वासरावीण पान्हा न सोडी ॥
हें तों धेनूतें उपजत खोडी । तैशीच आवडी साईंची ॥ ६४ ॥

मज चातकाचे नि आशे । आनदघन ही माउली वर्षे ॥
पुरवूनि माझिया अल्प तृषे । भक्त प्रकर्षे निववील ॥ ६५ ॥

काय भक्तिप्रेमाचें कौतुक । मातेस लागे बाळाची भूक ।
तयानें न पसरितां ही मुख । थान कुचुक ते कोंदी ॥ ६६ ॥

कोण जाणे तिचें शीण । लेंकुरा न त्याची जाण ॥
न पुसतां निज माउलीवीण । अन्य कोण दे थान ॥ ६७ ॥

बाळकासी घालितां लेणें । बालक त्यांतील स्वारस्य नेणे ॥
तें कौतुक एक माताच जाणे । तैसेंच करणें सद्गुरूचें ॥ ६८ ॥

हा माझा बाळाचा लळा ॥ पुरवील कोण सुख सोहळा ॥
माउलीवीण कोणास कळवळा ॥ तो जिव्हाळा दुर्मिळ ॥ ६९ ॥

सन्मातेच्या पोटीं येणें । महद्भाग्यें देवाचें देणें ॥
दुःख सोसून जन्म देणें । बालक नेणे हें कांहीं ॥ ७० ॥

असो ये अर्थी आणीक वचना । बाल्लिलें बाबा करवितों श्रवण ॥
अहो जी आपण श्रोते सज्जन । आदरें अवधान देईजे ॥ ७१ ॥

सन एकोणिसशें सोळा साली । चाकरी सरकारी पुरी झाली ॥
यथायोग्य पेन्शन चगली । वारी आली शिरडीची ॥ ७२ ॥

गुरुपौर्णिमेचा तो दिवस । भक्त मिळाले गुरुपूजेस ॥
अण्णा[1] स्वयंस्फूर्ती विनविती[2] बाबांस । करिती शिफारस ती परिसा

अण्णांस माझी मोठी काळजी । बाबांच्या समोर करिती अर्जीजी
यांच्या बाढल्या संसारामाजी । कृपा करा जी यांजवर ॥ ७४ ॥

---

१ अण्णा चिंचणीकर २ या लेखकाच्या

लावा कीं यांस दुजी नोकरी । ही पेन्शन काय पडेल पुरी ॥
अण्णासाहेबांची चिंता निवारी । ऐसें करी कांहीं मा ॥ ७५ ॥
बाबा तव वदती प्रत्युत्तरीं । मिळेल मेली तयासी नोकरी ॥
करावी आतां माझी चाकरी । सुख संसारीं लाधेल ॥ ७६ ॥
ताटें यांचीं भरलीं सदां । यावज्जीव न रितीं कदां ॥
भावें मत्पर होतां सर्वदा । हरतील आपदा तयाच्या ॥ ७७ ॥
कांहीं केलें काय झालें । म्हणती जन ते समजा चळले ॥
धर्माचरण ज्यांनीं वर्जिलें । तयांस पहिलें वर्जावें ॥ ७८ ॥
समोर येतां बाजूस जावें । महा भयंकर ते समजावे ॥
त्यांच्या छायेसही न रहावें । पडल्या सहावे कष्टही ॥ ७९ ॥
आचार हीन शील भ्रष्ट । विचारहीन कर्मनष्ट ॥
देखेना जो इष्टानिष्ट । केवीं तो अभीष्ट पावेल ॥ ८० ॥
लाग्याबांध्यावीण विशेषीं । कोणी न येई आपुले पाशीं ॥
श्वान शूकर का माशी । हडहड कुणाशीं करूं नये ॥ ८१ ॥
येथून पुढें भक्ति भावा । करावी यानें माझी सेवा ॥
करुणा येईल देवाधिदेवा । अक्षय ठेवा लाधेल ॥ ८२ ॥
मग ही पूजा करावी कैसी । मी कोण कैसा जाणावा भरंवसी ॥
साईचा तो देह विनाशी । ब्रह्म अविनाशी सुपूज्य ॥ ८३ ॥
मी तो अष्टधा प्रकृति रूपानें । भरलों आहे चौं बाजूनें ॥
हेंच अर्जुनास भगवंतानें । गीता व्याख्यानें निवेदिलें ॥८४॥
यावत्स्थावररूपाकृति । स्थावर जंगमात्मकही जगती ॥
मीच नटलों अष्टधा प्रकृति । ही एक चमत्कृति माझीच ॥ ८५ ॥

१ या लेखकास या नावानें बहुतेक हाक मारीत.

ॐप्रणव हा माझा वाचक । वाच्य तयाचा मीच एक ॥
विश्वाकार वस्तु अनेक । त्यांतही मी एक भरलेला ॥ ८६ ॥

आत्मभिन्न वस्तु नाहीं । तेथें कामना कशाची पाही ॥
मींचि अवघा ठायीं ठायीं । भरलों दाही दिशांतीं ॥ ८७॥

परिपूर्ण सर्वत्र एणें भावें । मी माझें हें जेथ विसावें ॥
तया कामनीय काय असावें । सर्व वसावें सर्वस्वीं ॥ ८८ ॥

कामना या बुद्धींत उगवती । आत्मयासीं संबंध न धरिती ॥
साईमहाराज निजात्म मूर्ती । कामना स्फूर्ति तेथें कैंची ॥ ८९ ॥

कामनांचे नाना प्रकार । मी कोण हें कळतांचि सार ॥
विरोनि जाती जैसी गार । रविकरनिकरसंतप्त ॥ ९० ॥

मन बुध्यादि इंद्रियांसकट । नव्हे मी स्थूल नव्हे विराट ॥
नव्हे मी हिरण्य गर्भ अप्रकट । साक्षी मी जुनाट अनादि ॥९१॥

एवं गुण इंद्रियां परता । नाहीं मज विषयतत्परता ॥
नाहीं मजविण ठाव रिता । कर्ता करवीता मी नव्हे ॥ ९२ ॥

मन बुद्ध्यादि इंद्रियगण । अवघा जडही जेथें ओळखण ॥
तेथेंच निरक्षी प्रकटेल जाण । सारील आवरण ज्ञानाचें ॥ ९३॥

स्वरूपाचें जें विस्मरण । तेंच मायेचें अवतरण ॥
शुद्ध पूर्णानंद स्मरण । तोच मी चैतन्य घनरूप ॥ ९४ ॥

त्या मजकडे फिरविणें वृत्ती । तीच सेवा ती मद्भक्ति ॥
चिदानंद मी होतां प्रतीती । शुद्ध स्थिती तें ज्ञान ॥ ९५ ॥

अयमात्मा ब्रह्म । प्रज्ञानमानंदं ब्रह्म ॥
जगन्मिथ्या वें जगद्भ्रम । सत्यत्वें ब्रह्म तो हा मी ॥ ९६ ॥

ॐप्रणव हा माझा वाचक । वाच्य तयाचा मीच एक ॥
विश्वाकार वस्तु अनेक । त्यांतही मी एक भरलेला ॥ ८६ ॥

आत्मभिन्न वस्तू नाहीं । तेथें कामना कशाची पाही ॥
मीचि अवघा ठायीं ठायीं । भरलों दाही दिशांतीं ॥ ८७ ॥

परिपूर्ण सर्वत्र एणें भावें । मी माझें हें जेथ विसावें ॥
तया कामनीय काय असावें । सर्व वसावें सर्वस्वीं ॥ ८८ ॥

कामना या बुद्धींत उगवती । आत्मयासीं संबंध न धरिती ॥
साईमहाराज निजात्म मूर्ती । कामना स्फूर्ति तेथें कैंची ॥ ८९ ॥

कामनांचे नाना प्रकार । मी कोण हें कळतांचि सार ॥
विरोनि जाती जैसी गार । रविकरनिकरसंतप्त ॥ ९० ॥

मन बुध्यादि इंद्रियांसकट । नव्हे मी स्थूल नव्हे विराट ॥
नव्हे मी हिरण्य गर्भ अप्रकट । साक्षी मी जुनाट अनादि ॥ ९१ ॥

एवं गुण इंद्रियां परता । नाहीं मज विषयतत्परता ॥
नाहीं मजविण ठाव रिता । कर्ता करवीता मी नव्हे ॥ ९२ ॥

मन बुद्ध्यादि इंद्रियगण । अवघा जडही जेथें ओळखण ॥
तेथेंच निरक्ती प्रकटेल जाण । सारील आवरण ज्ञानाचें ॥ ९३ ॥

स्वरूपाचें जें विस्मरण । तेंच मायेचें अवतरण ॥
शुद्ध पूर्णानंद स्मरण । तोच मी चैतन्य घनरूप ॥ ९४ ॥

त्या मजकडे फिरविणें वृत्ती । तीच सेवा ती मद्भक्ति ॥
चिदानंद मी होतां प्रतीती । शुद्ध स्थिती तें ज्ञान ॥ ९५ ॥

अयमात्मा ब्रह्म । प्रज्ञानमानंदं ब्रह्म ॥
जगन्मिथ्या वें जगद्भ्रम । सत्यत्वें ब्रह्म तो हा मी ॥ ९६ ॥

शिर्डी येथील

श्रीसद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे० सं० कृ० जा० भिष्म यांनी शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटली जाणारी पद्यें; व भजनकाळीं म्हणावयाजोगीं सदर शास्त्री भिष्म यांनी तयार केलेली पद्यें, परापूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

हरि सिताराम दीक्षित

पुस्तक मिळण्याचें ठिकाण—श्री. साईलीला ऑफीस.

रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर.

५ टर्नर रोड, बांद्रे.

चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी

शिर्डी, पो. राहता, जि. अहमदनगर.

शिर्डी येथील

श्रीसद्गुरु

# साईनाथ सगुणोपासना.

हें पुस्तक मूळ वे० शा० कृ० जा० भिष्म यांनी शके १८३३ त तयार केलें होतें. सांप्रत त्याची सुधारून वाढविलेली नवीन आवृत्ती छापण्यांत आली आहे.

श्रीसमर्थ साईनाथ महाराज यांच्या त्रिकाल आरतीचे वेळीं म्हटली जाणारी पद्यें; व भजनकाळीं म्हणावयाजोगी सदर शास्त्री भिष्म यांनी तयार केलेली पद्यें, परापूजा व मानसपूजा यांचा या लहानशा पुस्तकांत संग्रह केला आहे. पुस्तकाची किंमत दोन आणे ठेविली आहे.

हरि सिताराम दीक्षित

पुस्तक मिळण्याचें ठिकाण—श्री. साईलीला ऑफीस.

रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर.

५ टर्नर रोड, बान्द्रे.

चिटणीस श्री शिर्डी संस्थान कमिटी

शिर्डी, पो. राहता, जि. अहमदनगर.